**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.**
**कोकण परिमंडळ कार्यालय**
**ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी**

---

**ग्राहक तक्रार क्र. २४/२०१४** **दि. २५.०९.२०१४**

| | |
|---|---|
| **में. श्री पुष्कर पेट्रो प्रोडक्ट लि.**<br>**प्लॉट नं. बी १०३, एम्.आय.डी.सी.**<br>**लोटे, ता. खेड, जि. रत्नागिरी** | **तक्रारदार ग्राहक** |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| **अधिक्षक अभियंता, महावितरण**<br>**मंडल कार्यालय, रत्नागिरी** | **विरुध्द पक्षकार** |
| **फोरम उपस्थिती** | **१) श्री. डी. एस्. जामखेडकर,**<br>**अध्यक्ष**<br>**२) श्री. व्ही. बी. जगताप,**<br>**सचिव तथा कार्यकारी अभियंता**<br>**३) श्री. ज. पु. बिवलकर**<br>**सदस्य** |
| **ग्राहकाच्या वतीने** | **१) गौतम मखारिया ( प्रतिनिधी )** |
| **विरुध्द पक्षकाराच्या वतीने** | **१) सौ. ज्योत्स्ना सोनोने**<br>**सहाय्यक विधी अधिकारी**<br>**२) श्री. डी. एस. दिवटे**<br>**कार्यकारी अभियंता, रत्नागिरी** |

मे. पुष्कर पेट्रो प्रोडक्ट लि., प्लॉट नं. बी १०३ एम.आय.डी. सी.लोटे ता. खेड ,जि. रत्नागिरी ग्राहक क्रं. २२१०२९००९१५१ यानी, त्याना महावितरणकडून देणेत आलेल्या अतिरिक्त बीलाबाबतची तक्रार फॉर्म 'अ' मध्ये दि.२५.०९.२०१४ मध्ये दाखल केलेली आहे. तक्रार प्राप्त होताच मंचाकडील पत्र क्रं. १५० दि.२९.०९.२०१४ अन्वये अधिक्षक अभियंता, मंडल कार्यालय रत्नागिरी यांचकडे स्पष्टीकरण मागविणेत आले. सदर पत्रानुसार महावितरणकडून त्यांचे स्पष्टीकरण दि. १८.१०.२०१४ रोजी मंचाकडे प्राप्त झालेले आहे. त्यानंतर अधिनियामामधील तरतुदीनुसार उभयपक्षाना नोटीस काढून दि. १८.११.२०१४ रोजी सुनावणीची प्रक्रिया पुर्ण करण्यात आली.

तक्रारदाराकडून दाखल करण्यात आलेल्या तक्रारीचा तपशील असा की, त्यांचे उपरोक्त पत्त्यावर औद्योगिक कनेक्शन आहे. सदर कनेक्शन उच्चदाब ग्राहक या सदरात येते. महावितरणकडून हे कनेक्शन दि.२५.०१.१९९९ रोजी देणेत आलेले असून ऑक्टोबर १९९९ पर्यन्त येणारी सर्व बीले त्यानी वेळेवर भरलेली आहेत. त्यानंतर दि.२७.१०.१९९९ रोजी भरारी पथक रत्नागिरी यानी या कनेक्शनला भेट देऊन तपासणी केली व 'B' Phase C.T. मध्ये दोष असल्या बाबतच्या निष्कर्षाची नोंद केली. व रु. १०२४४०५/- इतक्या रक्कमेचे अतिरिक्त वीज बील फेब्रुवारी २००० मध्ये महावितरणकडून देण्यात आले, त्यानंतर जून २००० मध्ये रु. १०२०००००/- (रु. एक करोड दोन लाख ) इतक्या रक्कमेचा भरणा करण्याबाबत नोटीस पण महावितरणकडून देण्यात आली. त्यानंतर तक्रारदारानी दि. २९.०९.२००० रोजी मुख्य कार्यालय, प्रकाशगड, बांद्रा यांना लेखी निवेदन देऊन हे बील रद्द किंवा योग्य ती दुरुस्ती करण्याबाबत विनंती केली, पण आजतागायत कोणतीही कार्यवाही महावितरणकडून करण्यात आली नाही याउलट सहाय्यक विधी अधिकारी, रत्नागिरी मंडल यांचेकडून वीजपुरवठा खंडीत करण्याबाबत नोटीस देण्यात आली ज्यामध्ये मुळ रक्कम रु. ७४३९१४/- व व्याज रु. १९२२३००/- अशा प्रकारे एकूण रु. २६६६२१८/- इतकी रक्कम भरण्याबाबत आदेश देण्यात आलेला आहे.

महावितरणकडून सादर करण्यात आलेल्या स्पष्टीकरणामध्ये त्यानी मंचाला ही केस दाखल करुन घेण्याबाबत अधिकारी नाही या एकाच मुद्दयावर भर दिलेला आहे. हा मुद्दा स्पष्ट करताना अधिक्षक अभियंता रत्नागिरी मंडळ यानी नमुद केले आहे की ग्राहकाची ही तक्रार दि.२२.०२.२००० रोजी अदा करण्यात आलेल्या अतिरिक्त बीलाबाबत असून, तक्रारदारानी महावितरणकडून देणेत आलेल्या दि.२३.०७.२०१४ च्या नोटीशीबाबत या मंचाकडे हरकत घेतलेली आहे. पण ग्राहकाला देणेत आलेली ही नोटीस सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन रत्नागिरी यांच्या दि.०६.०३.२०१४ च्या आदेशानुसार देण्यात आलेली आहे. या प्रकरणामध्ये दाद मागण्यासाठी ग्राहकानीच कोर्टामध्ये केस दाखल केलेली होती व या प्रकरणाचा निर्णय देताना मे. सिव्हील जज्ज यानी ग्राहकाचे अपील फेटाळलेले आहे. त्यामुळे महावितरणकडून देणेत आलेली दि.२३.०७.२०१४ ची नोटीस योग्य आहे. ग्राहकानी या प्रकरणाचा निर्णय कोर्टाकडून झालेनंतर मुद्दाम ही केस मंचाकडे दाखल केलेली असून यामध्ये अतिरिकत बीलाच्या रक्कमेचा भरणा करण्याबात वेळ काढूपणा अवलंबिलेला आहे.

अधिनियामधील तरतुदीनुसार जर एखादया प्रकरणाचा निर्णय कोर्ट किंवा लवाद यांच्या मार्फत निर्णय झालेला असल्यास मंच अशा प्रकरणामध्ये हस्तक्षेप करु शकत नाही. अशी तरतूद आहे. सदर प्रकरणाचा निर्णय यापुर्वीच कोर्टाकडून दणेत आलेला आहे त्यामुळे मंचानी ही तक्रार फेटाळण्याबाबत विनंती केलेली आहे.

दरम्यानच्या काळात या तक्रारदारानी पुन्हा याच प्रकरणासाठी मा. हायकोर्ट मुंबई येथे केस दाखल केलेली असून, त्याचा दावा क्रं. १०९९१/२०१४ असा आहे. प्रस्तुत दाव्याबाबतची कागदपत्रे सौ. सोनोने यानी मंचाकडे स्वत: दि. १७.०१.२०१५ रोजी दाखल केलेली असून मंचानी या केसचा निकाल देण्यापूर्वी या बाबीचा देखील विचार करणेबाबत चर्चे दरम्यान विनंती केली.

दि. १८.११.२०१४ रोजी घेण्यात आलेल्या सुनावणीमध्ये ग्राहकाच्यावतीने श्री. गौतम मखारीया व महावितरणच्या वतीने सौ. ज्योत्स्ना सोनोने (सहाय्यक विधी अधिकारी) यानी सुनावणीमध्ये भाग घेतला व आपला युक्तीवाद सादर केला.

श्री मखारिया यानी आपली बाजू मांडताना हया प्रकरणामधील फॉर्म 'अ' मध्ये नमुद केलेल्या अतिरिक्त बिलाबातचा सर्व घटना क्रम पुन्हा सविस्तरपणे सांगितला तसेच महावितरणच्या स्पष्टीकरणामध्ये नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या अधिनियामामधील तरतुदींची कल्पना नसल्यामुळेच आपण हया प्रकरणामध्ये न्याय मिळण्यासाठी कोर्टात केस दाखल केल्याचे नमुद केले व मंचानी योग्य तो निर्णय देण्याबाबत विनंती केली.

सौ. सोनोने यानी महावितरणकडून आपला युक्तीवाद सादर करताना नमुद केले की, हया प्रकरणाचा निर्णय या पुर्वीच सिव्हिल जज्ज रत्नागिरी यानी दिलेला असून त्यानी निकाल देण्यापुर्वी या सर्व बाबी विचारात घेऊनच निर्णय दिलेला आहे, तसेच दि. २३.०७.२०१४ रोजी देणेत आलेली वीज पुरवठा खंडीत करण्याबाबतची नोटीस ही कोर्टाच्या आदेशाला अधीन राहूनच दिलेली आहे. एक वेळ कोर्टाकडून या प्रकरणाचा निर्णय दिल्यानंतर पुन्हा या मंचाकडे केस दाखल करण्यामागचा ग्राहकाचा उद्देश फक्त महावितरणच्या देय रक्कमेचा भरणा करण्याबाबत वेळ काढणेचा असून मंचाने ही केस फेटाळावी असे स्पष्टपणे नमुद केले. तसेच महाराष्ट्र वीज नियामक आयोग अधिनियम २००६ मधील विनिमय ६.७ (४) अनुसार कोणत्याही प्रकरणाचा निर्णय कोर्ट किंवा लवाद यांचेकडून दिलेला असल्यास वीज ग्राहक तक्रार निवारण मंच यामध्ये हस्तक्षेप करु शकत नाही व त्यामुळे मंचाने ही तक्रार फेटाळणे योग्य होईल असे नमुद केले.

सदर प्रकरणामध्ये दाखल झालेली कागदपत्रे व उभयपक्षानी केलेला युक्तीवाद या सर्व बाबींचा विचार करता मंचानी खालील प्रमाणे निष्कर्ष काढलेला आहे.

१) तक्रारदारानी दाखल केलेल्या फॉर्म 'अ' मध्ये खोटे प्रतिज्ञापत्र सादर केले असून या प्रकरणाचा निर्णय या पुर्वी जिल्हा न्यायालयात झालेला आहे ही बाब लपविलेली आहे.

२) महाराष्ट्र वीज नियामक आयोग अधिनियम २००६ विनिमय ६.७ (ड) मधील तरतुदीनुसार या प्रकरणामध्ये मंचाला हस्तक्षेप करता येत नाही.

तक्रारदारानी मंचाकडे दि.२५.०९.२०१४ रोजी दाखल केलेल्या फॉर्म 'अ' मध्ये दिलेल्या Declaration मधील कलम (e) मध्ये ग्राहकानी नमुद केले आहे की,

"The subject matter of my/ our Grievance has not been decided by any competent authority/ court/ arbitrator, and is not pending before any such authority/ court/ arbitrator."

वास्तविक या प्रकरणाची सुनावणी या पुर्वीच झालेली असल्यामुळे तक्रारदारानी ही बाब मुद्दाम लपविलेली असून त्यांचेकडून दिलेल्या प्रतिज्ञापत्रामधील माहीती चुकीची आहे असे लक्षात येते. तसेच फॉर्म 'अ' सोबत दाखल केलेल्या कागदपत्रामध्ये अर्जदारानी इतर सर्व कागदपत्रे जोडलेली आहेत पण मा. जिल्हा न्यायालयाच्या केसच्या निर्णयाची कागदपत्रे जाणूनबुजून जोडलेली नाहीत असे मंचाचे मत आहे.

महाराष्ट्र वीज नियामक आयोग अधिनियम २००६ मधील विनिमय क्रं. ६.७ (४) स्पष्ट असून त्यामधील तरतुद खालीलप्रमाणे आहे.

" ६.७ मंच गाऱ्हाणे दाखल करुन घेणार नाही

१) ------------------------

२) -------------------------

३) ----------------------------

४) जेथे, कोणतेही न्यायालय, न्यायधिकरण, लवाद अथवा अन्य कोणतेही प्राधिकरण यांच्यापुढे त्याच गाऱ्हाण्याच्या संदर्भात ग्राहकाचे अभिवेदन प्रलंबित आहे किंवा अशा कोणत्याही न्यायालय, न्यायाधिकरण, लवाद अथवा अन्य कोणतेही प्राधिकरण यांनी यापूर्वीच डिक्री किंवा निवाडा किंवा अंतिम आदेश दिलेला आहे."

अधिनियमामधील वरील तरतूद स्पष्ट असून मंचाला या प्रकरणामध्ये हस्तक्षेप करता येणार नाही तसेच या विनिमयाच्या अधीन राहून तक्रारदाराची तक्रार फेटाळणे योग्य होईल असे मंचाचे स्पष्ट मत आहे.

मंचाचे सदस्य सचिव वैद्यकीय रजेवर असल्याने प्रस्तुत प्रकरणी निर्धारित मुदतीत आदेश देता आला नाही.

मंचाने नोंदविलेल्या वरील निष्कर्षानुसार खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

**१) तक्रारदाराची तक्रार फेटाळणेत येत आहे .**

**२) खर्च किंवा अनुषंगिक बाबीसाठी कोणताही आदेश नाही.**

**३) या आदेशाविरुध्द अर्जदारास अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात अपील दाखल करता येईल.**

**पत्ता :- सचिव,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग,**
**६०६/६०८, केशवा,**
**बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुबंई ४०००५१.**
**फोन नं. ०२२- २६५९२९६५**

| | | |
|---|---|---|
| **श्री. डी. एस्. जामखेडकर** | **श्री. व्हि.बी.जगताप** | **श्री.ज.पु.बिवलकर** |
| **अध्यक्ष** | **सचिव / कार्यकारी अभियंता** | **सदस्य** |
| **ग्रातनिमं, कोकण परिमंडल** | **ग्रातनिमं, कोकण परिमंडल** | **ग्रातनिमं, कोकण परिमंडल** |

**दिनांक :- २०.०१.२०१५**
**ठिकाण :- रत्नागिरी.**